# महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक ३०/०७/२०१९ रोजी आयोजित केलेल्या २८६ व्या बैठकीचे स्थायी कार्यवृत्त

---

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाची २८६ वी बैठक मंगळवार, दिनांक ३० जुलै २०१९ रोजी गुलझारीलाल नंदा सभागृह, गृहनिर्माण भवन, कलानगर, वांद्रे पूर्व, मुंबई : ४०० ०५१ येथे आयोजित करण्यात आली. सदर दिवशी अतिवृष्टीमुळे सन्माननीय अतिर्थीना बैठकीला पोहचण्यास कालावधी लागण्याची शक्यता गृहीत धरुन सदर बैठक विलंबाने दुपारनंतर सुरु करण्यात आली.

**सदरहू बैठकीस खालील प्रमाणे उपस्थिती होती :---**

| | | | |
|---|---|---|---|
| **१.** | **मा. श्री.उदय सामंत** | **:** | **अध्यक्ष / प्राधिकरण** |
| **२.** | **मा.श्री. मिलिंद म्हैसकर** | **:** | **उपाध्यक्ष/प्राधिकरण** |
| **३.** | **मा.श्री. संजय कुमार**<br>**अपर मुख्य सचिव,**<br>**गृहनिर्माण विभाग** | **:** | **सदस्य/ प्राधिकरण** |

सदरहू बैठकीस विशेष निमंत्रित म्हणून खालीलप्रमाणे मंडळांचे सभापती उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| **१. मा.श्री. मधु चव्हाण** | **:** | **सभापती, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ.** |
| **२. मा.श्री. विनोद घोसाळकर** | **:** | **सभापती, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ.** |
| **३. मा.श्री. बाळासाहेब पाटील** | **:** | **सभापती, कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ.** |
| **४. मा.श्री. संजय केणेकर** | **:** | **सभापती, औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ.** |

मा. डॉ. नितिन करीर, प्रधान सचिव, नगर विकास विभाग-१, सदस्य / प्राधिकरण यांनी मंत्रीमंडळ बैठक असल्यामुळे सदर बैठकीस उपस्थित राहणार नसल्याचे कळविले होते. सदर अनुपस्थितीची नोंद घेण्यात आली. त्यानंतर मा. अध्यक्ष / प्रा. यांच्या परवानगीने विषय सुचीवरील विषय चर्चेस घेण्याबाबत निवेदन केले.

**बाब क्रमांक : २८६/१**

**विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक १८/०६/२०१९ रोजी झालेल्या २८५ व्या बैठकीचे प्रारुप कार्यवृत्त स्थायी करणेबाबत.**

---

प्राधिकरणाच्या २८५ व्या बैठकीचे प्रारुप कार्यवृत्त झालेल्या चर्चेनुसार सुचविलेल्या दुरुस्त्यांसह स्थायी करण्यात आले.

**बाब क्रमांक : २८६/२**

**विषय :- आयकर खात्यास आर्थिक वर्ष २०१८-१९ करिता प्रपत्र १० सादर करणेबाबत.**

---

उक्त विषय पुढे ढकलण्यात आला.

**बाब क्रमांक : २८६/३**

**विषय :- मुंबई मंडळाच्या सोडतीतील काही लाभार्थी सदनिका परस्पर दलालांना विकत असल्याबाबत.**

---

उक्त विषय पुढे ढकलण्यात आला.

**बाब क्रमांक : २८६/४**

**विषय :- नविन चंद्रपूर येथे मल:निसारण व्यवस्था, सिव्हरेज कनेक्शन टँक, पंपिंग स्टेशन व सिव्हरेज ट्रीटमेंट प्लँट इत्यादी कामाच्या निविदेची स्वीकृती करण्याबाबत.**

---

उक्त विषय पुढे ढकलण्यात आला.

**बाब क्रमांक : २८६/५**

**विषय :- पुनर्रचित इमारतीमधील अथवा मिलच्या जमिनीवरील बांधण्यात आलेल्या इमारतींमधील मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाकडे वर्ग केलेले गाळे संक्रमण गाळे म्हणुन वितरीत केलेल्या प्रकरणी सदर इमारतीमधील गृहनिर्माण संस्था आकारणी करित असलेल्या सेवाशुल्काप्रमाणे संक्रमण गाळयापोटी सेवाशुल्काची / भाड्याची आकारणी करण्याबाबत.**

---

उक्त विषय पुढे ढकलण्यात आला.

**बाब क्रमांक : २८६/६**

**विषय :- पुणे शहरातील म्हाडाच्या जीर्ण झालेल्या इमारतींना ४.०० एफ़एसआय लागू करणेबाबत तसेच महाराष्ट्र शासनाच्या दि.२३/०५/२०१८ चे अधिसूचनेच्या धर्तीवर बृहन्मुंबईसह उर्वरित महाराष्ट्रातील म्हाडाचे अभिन्यासामधील क्षेत्रासाठी म्हाडास नियोजन प्राधिकरणाचे अधिकार वापरण्याबाबत प्रस्ताव.**

---

उक्त विषय पुढे ढकलण्यात आला.

**बाब क्रमांक : २८६/७**

**विषय :- सुविधा भूखंडांचा विकास करण्याकरीता धोरण निश्चित करणेबाबत.**

---

उक्त विषय पुढे ढकलण्यात आला.

**बाब क्रमांक : २८६/८**

**विषय :- झो.प.सु. कार्यक्रमातंर्गत मुंबई शहर व उपनगर मध्ये विविध ठिकाणी डोंगरीभागात भूसखलने टाळणेसाठी स्थळ परिस्थितीनुसार आवश्यकते प्रमाणे दगडी बांधकाम किंवा सलोह सिमेंट कॉंक्रीटमध्ये संरक्षक भिंती बांधणेसाठी निश्चित केलेल्या मे. ॲशकॉन्स इन्फ्रास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेड या कंत्राटदारास दिलेले स्विकृती पत्र रदद करुन पुर्वीप्रमाणे प्रत्येक कामाकरीता स्वतंत्र निविदा काढणेबाबत.**

---

उक्त विषय पुढे ढकलण्यात आला.

**बाब क्रमांक : २८६/९**

**विषय :- मा. मंत्री, गृहनिर्माण, महाराष्ट्र शासन मंत्रालय यांचे कार्यालयाकरीता नविन खरेदी करण्यात आलेल्या वाहनाच्या खरेदी खर्चास कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत.**

---

उक्त विषय पुढे ढकलण्यात आला.

**बाब क्रमांक : २८६/१०**

**विषय :- मा. मंत्री, गृहनिर्माण, महाराष्ट्र शासन मंत्रालय यांचे करीता खरेदी करण्यात आलेल्या वाहन क्र. एम एच ०२ ई एफ ८९९८ या वाहनात म्हाडा मार्फत इंधन पुरवठा खर्चास मंजुरी मिळणेबाबत.**

---

उक्त विषय पुढे ढकलण्यात आला.

**बाब क्रमांक : २८६/११**

**विषय :- मा. मंत्री, गृहनिर्माण, महाराष्ट्र शासन मंत्रालय यांचे कार्यालयात दैनंदिन कार्यालयीन कामाकरीता भाडेतत्वावरील २ अतिरीक्त कंत्राटी वाहने म्हाडाच्या प्रचलीत भाडेतत्वावरील दराने मुंबई मंडळ (म्हाडा) कडून उपलब्ध करुन देणे बाबात.**

---

उक्त विषय पुढे ढकलण्यात आला.

**बाब क्रमांक : २८६/१२**

**विषय :- मालवणी, मालाड येथील स्थापन झालेल्या सह. गृह. संस्थांना वितरीत केलेले भुखंड सी. आर. झेड बाधित असल्याने त्यांचे स्थलांतर पी. जी., आर. जी. भूखंडावर करणेबाबत.**

---

उक्त प्रस्ताव बाब टिपणीसह पुढील बैठकीत सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

**बाब क्रमांक : २८६/१३**

**विषय :- सी. टी .एस. नं १/३ कोपरी पवई, चांदिवली येथील मोकळया भूखंडावर गृहनिर्माण प्रकलांतर्गत घरबांधणी करण्याच्या (टर्न की प्रकल्प) निविदा प्रक्रीयेमध्ये निविदेची स्विकृती करणेबाबत.**

---

उक्त प्रस्ताव बाब टिपणीसह पुढील बैठकीत सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

**बाब क्रमांक : २८६/१४**

**विषय :- प्राधिकरणाच्या बैठकीमध्ये विविध विषयांबाबत गठीत करण्यात आलेल्या समित्यांचे अहवाल सादर करणेबाबत.**

---

उक्त प्रस्ताव बाब टिपणीसह पुढील बैठकीत सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

**बाब क्रमांक : २८६/१५**

**विषय :- तळमजला गाळयातील रहिवाशी यांना बृहतसुचीमध्ये समाविष्ट करुन सदर जमिनी संपादीत करून त्यांचा विकास करण्याचे धोरण.**

---

उक्त प्रस्ताव बाब टिपणीसह पुढील बैठकीत सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

**बाब क्रमांक : २८६/१६**

**विषय :- प्लॉट क्र. ए/७९१ (भाग) वांद्रे येथील फुटबॉलसाठी देण्यात आलेल्या मैदानाचा वापर करण्याची मुदत वाढविणेबाबत.**

---

उक्त विषयावर सभागृहात अशी चर्चा करण्यात आली कीं, मौजे वांद्रे येथील न.भु.क्र. ए/७९१ या मिळकतीवरील सुमारे ११,१२१ चौ.मी. क्षेत्रफळाचा भूखंड फुटबॉल खेळण्याच्या वापराकरिता मिळणेबाबत " मुंबई जिल्हा फुटबॉल संघटना " या संघटनेने विनंती केली आहे. त्याअनुषंगाने उक्त संघटनेला सदर भूखंडाचा वापर दिनांक २२/०९/२०१७ ते २१/०९/२०१९ या कालावधीसाठी पूर्वलक्षी प्रभावाने करण्यास संमती दिल्याबाबत मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाने कळविले आहे. तरी, प्राधिकरणाने सदर मैदानाचा वापर करण्याची मुदत दिनांक २१/०९/२०१९ पासून पुढील ५ वर्षांसाठी वाढविण्यास सहमती दर्शविली आणि सदर बाबत मुख्य अधिकारी / मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ यांनी कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीबाबत प्राधिकरणाला अवगत करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

वरील विषयी चर्चा होवून

**ठराव क्रमांक :** ६८८3 **दिनांक : ३०/०७/२०१९**

प्राधिकरणाने निर्णय घेतला कीं, मुंबई जिल्हा फुटबॉल संघटना या संस्थेला मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळांतर्गत मौजे वांद्रे येथील न.भू. क्र. ए/७९१ येथील फुटबॉल खेळण्यासाठी देण्यात आलेल्या

मैदानाचा वापर करण्याची मुदत दिनांक २१/०९/२०१९ पासून पुढे पाच वर्षासाठी वाढविण्यास प्राधिकरण मान्यता देत आहे. तसेच सदर कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीबाबत मुख्य अधिकारी / मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ यांनी प्राधिकरणास अवगत करण्यास प्राधिकरण मान्यता देत आहे.

सदर ठराव कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता अंमलबजावणी करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**( मिलिंद म्हैसकर )**
**उपाध्यक्ष/ प्राधिकरण**

**( संजय कुमार )**
**सदस्य/ प्राधिकरण तथा**
**अपर मुख्य सचिव,गृहनिर्माण विभाग**

**(उदय सामंत )**
**अध्यक्ष / प्राधिकरण**

**बाब क्रमांक : २८६/१७**

**विषय :- प्रतिक्षानगर, सायन येथील ओटा विक्रेते संदर्भात नेमण्यात आलेल्या एक सदस्यीय समितीचा अहवाल सादर करण्याबाबत**

---

उक्त प्रस्ताव बाब टिपणीसह पुढील बैठकीत सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

**बाब क्रमांक : २८६/१८**

**विषय :- विरार बोळींज येथे पत्रकार, तसेच म्हाडा अधिकारी/कर्मचारी, शासकीय अधिकारी / कर्मचारी यांचेसाठी घरे राखीव ठेवण्याबाबत.**

---

उक्त प्रस्ताव बाब टिपणीसह पुढील बैठकीत सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

**बाब क्रमांक : २८६/१९**

**विषय :- पलावा -२०% गाळे-सोडतीनंतर-कार्यपध्दती निश्चित करण्याबाबत.**

---

उक्त प्रस्ताव बाब टिपणीसह पुढील बैठकीत सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

**बाब क्रमांक : २८६/२०**

**विषय :- बाळकुम, ठाणे येथील सन २००२ लॉटरीमधील अर्जदारांची प्रलंबित पात्रता निश्चितीकरुन सदनिकेचे वितरण करण्याबाबत प्राधिकरणाच्या बैठकीत ठेवण्याच्या बाब टिप्पणीबाबत.**

---

उक्त प्रस्ताव बाब टिपणीसह पुढील बैठकीत सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

**बाब क्रमांक : २८६/२१**

**विषय :- मा. मंत्री, गृहनिर्माण, महाराष्ट्र शासन मंत्रालय यांचे कार्यालयाकरीता नविन खरेदी करण्यात आलेल्या वाहनाच्या खरेदी खर्चास कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत.**

---

उक्त विषय पुढे ढकलण्यात आला.

**बाब क्रमांक : २८६/२२**

**विषय :- मा. मंत्री, गृहनिर्माण, महाराष्ट्र शासन मंत्रालय यांचे करीता खरेदी करण्यात आलेल्या वाहन क्र. एम एच ०२ ई एफ ८९९८ या वाहनात म्हाडा मार्फत इंधन पुरवठा खर्चास मंजुरी मिळणेबाबत.**

---

उक्त विषय पुढे ढकलण्यात आला.

**बाब क्रमांक : २८६/२३**

**विषय :- मा. मंत्री, गृहनिर्माण, महाराष्ट्र शासन मंत्रालय यांचे कार्यालयात दैनंदिन कार्यालयीन कामाकरीता भाडेतत्वावरील २ अतिरीक्त कंत्राटी वाहने म्हाडाच्या प्रचलीत भाडेतत्वावरील दराने मुंबई मंडळ (म्हाडा) कडून उपलब्ध करुन देणे बाबात.**

---

उक्त विषय पुढे ढकलण्यात आला.

**बाब क्रमांक : २८६/२४**

**विषय :- स.क्र. ३९२/१/अ बोळींज, विरार, ता. वसई, जि. पालघर या ठिकाणी प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत अत्यल्प उत्पन्न गटाच्या सदनिका बांधण्याच्या कामाच्या टर्न की पध्दतीनुसार असलेल्या निविदेची स्विकृती करण्याबाबत.**

---

उक्त विषय पुढे ढकलण्यात आला.

विषयसूचीवरील विषयांवर चर्चा करुन निर्णय घेतल्यानंतर माननीय अध्यक्ष यांनी उपस्थित सन्माननीय सभापती व सदस्यांचे आभार मानले व बैठक समाप्त झाल्याचे जाहीर केले.

**( मिलिंद म्हैसकर )**
**उपाध्यक्ष/ प्राधिकरण**

**( संजय कुमार )**
**सदस्य/ प्राधिकरण तथा**
**अपर मुख्य सचिव,गृहनिर्माण विभाग**

**( उदय सामंत )**
**अध्यक्ष / प्राधिकरण**